**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0985 **Year (वर्ष):** 2024

   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**18/12/2024 21:28

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 17/12/2024

      **Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/12/2024

      **Time From (वेळेपासून):** 19:00 बजे

      **Time To (वेळेपर्यंत):** 14:00 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

   **Date (दिनांक ):** 18/12/2024 **Time (वेळ):** 21:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

   **Entry No. (नोंद क्र.):** 039

   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/12/2024 21:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

   पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** सात रस्ता, शासकीय विश्रामगह ,येथील सुदा इडली गह हया हटेलच,समोर सार्वजनिक रस्त्यावर सोलाप

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रकाश कैलास हांडगे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** कैलास हांडगे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 98,शांतीनगर झोपडपट्टी, शिवदारे,मंगल कार्यालय समोर, मार्केट ,यार्डजवळ, हैद्राबाद रोड,सोलापू,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 98,शांतीनगर झोपडपट्टी, शिवदारे,मंगल कार्यालय समोर, मार्केट ,यार्डजवळ, हैद्राबाद रोड,सोलापू,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9657049696

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | माधव विष्णुपंत जोशी | | | 1. 103,द्वारका पॅरडाईस मोहिते नगर ,होटगी रोड,सोलापुर ,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

पोलीस निरिक्षक सदर बझार
सत्यमेव जयते
पोलीस स्टेशन सोलापूर शहर

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्यादी जबाब दि.18.12.2024

मी श्री.प्रकाश कैलास हांडगे, वय- 31 वर्षे, व्यवसाय- लॅब टेक्नीशन व मॅनेजर, रा. प्लॉट नं. 98, शांतीनगर झोपडपट्टी, शिवदारे मंगल कार्यालय समोर, मार्केट यार्डजवळ, हैद्राबाद रोड, सोलापूर.मो.नं. 9657049696 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून, माझे शिक्षण मेडीकल लॅब टेक्नीशनमध्ये झालेले असून, मी श्री. साई डायग्नोस्टिक, गाळा नं. 03, दुसरा मजला, सुधाकर कॉम्पेल्स, बँक ऑफ इंडियाजवळ, सात रस्ता चौक, सोलापूर येथे लॅब टेक्नीशन व मॅनेजर म्हणून नोकरीस आहे. त्यावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो. काल दि. 17.12.2024 रोजी मी श्री. साई डायग्नोस्टिकचे मालक डॉ. श्री. शैलेश शामलिंग पटणे यांचेसह अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथे हजर राहून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार पोलीस उप अधीक्षक श्री. गणेश कुंभार यांना सांगीतली. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांनी वस्तू व सेवा कर कार्यालय, सोलापूर येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेवून प्पोउपअधी. श्री. कुंभार यांनी सापळा पथक व दोन शासकीय पंच यांची माझ्याशी ओळख करुन दिली. त्यावेळी पोउपअधी. श्री. कुंभार यांनी मला माझी तक्रार विचारली असता, मी खालीलप्रमाणे माझी तक्रार थोडक्यात सांगीतली.

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे कार्यान्वयीत असलेल्या महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत दाखल होणा-या रुग्णांना लागणारे रक्त व लघवी तपासणी करण्याचे काम मा. अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांचेकडून निविदेव्दारे आमचे श्री. साई डायग्नोस्टिक लॅबचा मिळाले होते. सदरच्या निविदेचा कालावधी हा दि. 01.04.2022 ते दि. 31.03.2024 रोजी पावेतो असून त्यापुढे मा. अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांचे सुचनेप्रमाणे सदर कामाची मुदत वेळोवेळी वाढविण्यात आलेली होती. त्यानंतर मा. अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांचेकडून वर नमूद सेवा दि. 18.09.2024 रोजी नंतर बंद करण्याबाबतचे तसेच आजवरची दिलेल्या सेवेचे देयके लवकरात लवकर सादर करुन संबंधित देयकांचा निपटारा करण्याबाबतचे पत्र प्राप्त झालेले आहे. त्याप्रमाणे बिल तयार करुन मंजूरीसाठी मा. अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांचे कार्यालयात गेले दोन महिन्यापूर्वी सादर केलेले आहेत. त्यानंतर दि. 07.12.2024 रोजी महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. माधव जोशी यांनी मला संपर्क साधून आमच्या श्री. साई डायग्नोस्टिक लॅबची तक्रार झाली असल्याचे व सदर तक्रारीची चौकशी ते करीत असल्याचे व सदर तक्रारीबाबत चौकशी करुन जर अहवाल पुढे पाठविला तर तुमची उर्वरित बील मंजूर होणार नसल्याचे सांगून सदर तक्रारीबाबत अहवाल आमच्या लॅबच्या बाजूने पाठवण्यासाठी तुम्हाला काहीतर करावे लागेल असे सांगीतले. त्यानंतर दि. 08.12.2024 रोजी डॉ. माधव जोशी यांनी पुन्हा आम्हास कामत हॉटेल येथे बोलावून तक्रारीचा अहवाल लॅबच्या बाजूने पाठविण्यासाठी पैशाची मागणी केली. त्यावर आम्ही विचार करुन सांगतो असे सांगीतले होते.

त्यानंतर दि. 10.12.2024 रोजी डॉ. माधव जोशी यांनी मला शासकीय विश्रामगृहजवळील सुदा इडली गृह हॉटेल येथे बोलावून लॅबविरोधात प्राप्त तक्रारीबाबत अहवाल आमच्या लॅबच्या बाजूने पाठवण्यासाठी म्हणून 02 लाख रुपयांची मागणी केली, त्यावेळी मी लॅबचे मालक डॉ. पटणे यांचेशी बोलून सांगतो असे म्हणून तेथून निघून आलो. त्यानंतर दि. 11.12.2024 रोजीचे सायंकाळी 16.40 वा. चे दरम्यान माझी डॉ. जोशी यांची सुदा इडली गृह हॉटेलचे समोर भेट झाली. व काहीतरी पैसे कमी करण्यास सांगीतले असता, त्यांनी आता 01 लाख रुपये व उर्वरीत बील मंजूर झाल्यानंतर 01 लाख रुपये अशा रक्कमेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना सध्या पैसे



Scanned with CamScanner

नसल्याचे सांगून, सोमवारी मित्र पैसे देणार असल्याचे सांगून, त्यांचेकडून सोमवार पर्यंत पैसे देण्याची मुदत मागून घेतली. त्यानंतर सोमवार दि. 16.12.2024 रोजी सायंकाळी माझे मो.नं. 9657049696 यावर डॉ. जोशी यांचा मो.नं. 9421346959 वरुन व्हाटस्अॅप व्हाईस कॉल करुन काय झालं पैशाचे, जर ठरल्याप्रमाणे पैसे दिले नाहीत तर तक्रारीचा अहवाल लॅबचे विरोधात पाठवल्यामुळे लॅबकडून महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत केलेल्या कामाचे उर्वरीत बीले मंजूर होणार नाहीत असे सांगीतले. त्यावर मी अजून पैशाची व्यवस्था झाली नसल्याचे सांगून उदया येवून भेटतो असे त्यांना सांगीतले. अशाप्रकारे माझ्याकडे वरील प्रमाणे होत असलेल्या लाच मागणीबाबत मी सविस्तर लेखी तक्रार दि. 17/12/2024 रोजी श्री. साई डायग्नोस्टिकचे मालक डॉ. शैलेश पटणे यांचे सह हजर राहून पंचासमक्ष दिली. सदरची लेखी तक्रार पोलीस उपअधीक्षक श्री. कुंभार व पंचानी वाचून त्यावर त्यांनी सह्या केल्या.

सदरवेळी महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेचे सोलापूर जिल्हा समन्वयक डॉ. माधव जोशी यांची भेट घेवून पडताळणी कारवाई करावयाची असल्यामुळे पोउपअधी. श्री. कुंभार यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकले व पोउपअधी. श्री. कुंभार यांचे सुचनेवरुन मी पंचा समक्ष डॉ. जोशी यांना फोन केला असता, आमच्या मध्ये रंगभवन कडून सात रस्ताकडे जाणा-या रोडवरील अलिशान बार येथे भेटण्याचे ठरले. सदरचे कॉल रेकॉर्डिंग पोउपअधी. श्री. कुंभार यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्डींग करुन घेतले आहे. सदर ठिकाणी जिल्हा समन्वय श्री. माधव जोशी यांचेवर लाच मागणीबाबत पडताळणी कारवाईसाठी पोउपअधी. श्री. कुंभार यांनी मला तसेच पंच 01 श्री. गुट्टे यांना योग्य त्या सुचना देवुन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 श्री. गुटटे यांना माझेकडील मो. सायकल MH 13 EN 2481 वरुन पाठवले. सदर ठिकाणी पंचासमक्ष जावून मी डॉ. माधव जोशी यांची भेट घेतली असता, त्यांनी पंचास बाजूला थांबण्यास सांगून त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून काय नाही.. काय झालं असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना तेच सर पटनी सर मी.. दोन दिवस झाला डिस्क्शन करा लागलोय.. सर म्हणतेत तक्रार वगैरे कशाची तक्रार आलीय कोण केलय तक्रार असे विचारले असता, डॉ. जोशी बघायच आहे का मग.. मग दाखवतो तुला उद्या ये.. असे म्हणाले, त्यावर मी तस नाही सर.. असे म्हणालो असता, बग मी उद्याच्याला तुला तक्रार आलेली दाखवतो.. त्याच्यानंतर पाहिजे असेल तर बघायला ते सर्व डॉकुमेंट दाखवतो..कन्फर्म कर.. मग ये.. असे डॉ. जोशी म्हणाले. त्यावर मी नाही तेज काय नाही... ते पण बोललो.. मी सरांशी सर म्हणले एकदा तुम्हाला भेटुन बोलुन घे परत..अं कस आहे असे म्हणालो असता, डॉ. जोशी मला म्हणाले की, कितीदा भेटणार अन बोलनार रे... ते ... अशे विषय लई नसतेत.. एकदा झटकी पट राहतेत... कुठलीही गोष्ट असे म्हणून त्यांनी उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून लाचेची मागणी केली. त्यावर मी नई सोमवारी म्हणलो होतो ना तुम्हाला.. ते... असे म्हणालो असता, डॉ. जोशी मग सोमवारच आज बुधवार आला की.. असे मला म्हणाले, त्यावर मी काय आडझेस्ट झाल नाही म्हणून..उद्या एक... आजचा एक दिवस सर..उद्या दुपारी आकरा बारा पर्यंत.. असे म्हणालो असता, डॉ. जोशी ठिक आहे मी उद्या तुला आधी तक्रार दाखवतो.. तुझ कन्फर्मेशन करुन देतो.. असे मला म्हणाले. त्यावर मी नाही..नाही. तस नाही.. असे म्हणालो असता, त्यावर डॉ. जोशी मेजर तक्रार आहे.. अनी उद्या तुला अडचण होऊ शकते तेज्यात काय.. काय ... बग आधी तक्रार दाखवतो तुला उद्या... मला भेट उद्या सकाळी फोन कर मी कुठ आहे दाखवतो तुला.. माझी बॅग राहीली असती तर.. तुला दाखवीलो असतो.. मग काय.. अरे.. उद्या तु करुनघे अधी तक्रार बघ... तुला वाटल तर मग दे... नसल तर मग नको.. तस काय कम्प्लशन नाही माझ्या कडे.. असे मला म्हणाले, त्यावर मी नाही मी म्हणालतो की पन्नास दिलो असतो... पण त्यांच उद्या संध्याकाळ पर्यंत होतो म्हणालेत... म्हणजे मी.. हं मग उद्या पुर्ण एक.. एक लाख रुपये देतो.. असे म्हणालो असता, डॉ. जोशी संध्याकाळी दे.. हं... घाई गडबड नाही.. असे म्हणून माझ्याकडे डॉ. जोशी यांनी लाचेची मागणी केली आहे. त्यानंतर मी व पंच असे पोउपअधी. श्री. कुंभार यांना भेटून डॉ. जोशी व माझ्यामध्ये पडताळणी वेळी घडलेली वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांनी आमच्याकडे विचारपूस करुन तसेच व्हॉईसरेकॉर्डरमधील संभाषण ऐकून डॉ. जोशी यांनी माझ्याकडे लाच मागणी केल्याची व दिनांक 18.12.2024 रोजी लाच रक्कमेसह भेटावयास बोलावले असल्याची खात्री केली.

त्याप्रमाणे आज दि. 18.12.2024 रोजी मी पोउपअधी. श्री. यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे छत्रपती संभाजी महाराज तलावाच्या बाजूने जाणा-या रोडवरील वर नमूद निर्मनुष्य ठिकाणी भेटलो. सदर ठिकाणी काल करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई वेळेचे शासकीय पंच व सापळा पथक हजर होते. त्यावेळी पोउपअधी. श्री. कुंभार यांनी डॉ. माधव जोशी यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती दिली, मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती दिली, सदर वेळी मी हजर केलेले भारतीय चलनातील 500/- रुपये



Scanned with CamScanner

पोलीस निरिक्षक सदर बझार पोलीस स्टेशन सोलापूर शहर

दराचे दोन बंडल असे 1,00,000/- रू. रकमेच्या नोटा यावर त्यांचे स्टाफच्या हस्ते अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा मी दिलेल्या पिवळया रंगाच्या पिवशीत ठेवल्या. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांनी डॉ. जोशी यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन करून रक्कम घेऊन येत असल्याचे सांगुन ते कुठे भेटतील याबाबत विचारणा करण्यास सांगून त्यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू केला, त्याप्रमाणे मी डॉ. जोशी यांना फोन करून स्पीकर चालू ठेवले व त्यावेळी मी डॉ. जोशी यांना हां.. हां.. सर ते लाख रुपये.. लाख रुपये झाले म्हणल अॅडजेस.. तेच कुट घेऊन येऊदे सर...असे म्हणालो असता, डॉ. जोशी हां.. अं... सात रस्त्याला येतोस... सुदा हॉटेलच्या आपोझीट किती वेळात येतोस.. असे म्हणून मला लाच रक्कम घेवून सात रस्ता शासकीय विश्रामगृह येथील सुदा इडली गृह हया हॉटेलच्या समोर बोलावले.

त्यानंतर पोउपअधी श्री. कुंभार यांनी सापळा कारवाई करण्याचे ठरवून वरील प्रमाणे सापळापुर्व कारवाई करुन, आम्हाला योग्य त्या सुचना देवून, मी दिलेली अँथ्रासिन पावडर लावलेली 1,00,000/- रू. रकमेच्या नोटा ठेवलेली पिशवी माझ्याकडे देवून, सदरची पिवशी मला माझ्या मो. सायकलच्या डिकीमध्ये ठेवण्यास सांगून, डॉ. माधव जोशी यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 गुट्टे यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन सात रस्ता, शासकीय विश्रामगृह येथील सुदा इडली गृह हया हॉटेलच्या समोर रवाना केले. सदर ठिकाणी मला डॉ. जोशी हे सुदा इडली गृह हया हॉटेलच्या समोर सात रस्त्याकडून गांधीनगरकडे जाणा-या रोडवर त्यांचेकडील मो.सायकल क्र. एमएच 25 एबी 3355 वर थांबलले दिसले. तेथे जावून मी पंच क्र. 01 यांचेसह डॉ. माधव जोशी यांची भेट घेतली असता, मी त्यांना आमच्या लॅबबाबत कोणी तक्रार केली आहे असे विचारले असता, डॉ. जोशी यांनी मला त्यांचे सॅकमधून तक्रारी अर्ज काढून दाखवला, सदर अर्ज हा वैदयकीय मंत्री यांचेकडून मुख्यमंत्री यांचेकडे व त्यांचेकडून महात्मा ज्योतीबाच्या सिओकडून व सीएस कडून चौकशीसाठी त्यांचेकडे प्राप्त झाला असल्याचे व त्यामध्ये 2022 व 2023 या काळामध्ये रक्त चाचणीचे बोगस बिले काढल्याबाबत श्री. साई डायनॉस्टीक, सोलापूर यांची चौकशी करण्याचे नमूद असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी डॉ. जोशी यांना सर ... तुम्ही म्हणल्यासारख नां लाख रुपये केलो अॅडजेस्ट... इथच देऊ असे म्हणालो असता, डॉ. जोशी आणला का.. टाक हेच्यात असे म्हणून त्यांच्याकडील सॅकच्या कप्प्याची चेन उघडून पैसे सॅकमध्ये ठेवण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझ्या मो. सायकलचे डीकमध्ये ठेवलेली पिवळया रंगाचे पिवशी काढून सदर पिशवीमध्ये ठेवलेली 500/- रुपये दराचे दोन बंडल असे एकूण 1,00,000/- रुपये मी माझ्या उजव्या हाताने पिवशीतून काढून त्यांचे समोर धरले असता, डॉ. जोशी अरे पॅक आणायच असतय..अश्यात आणायच असतय का असे मला म्हणाले. त्यावर मी नई ते माझे डॉकुमेंट होते ना..सर...घ्या की.. असे त्यांना म्हणालो असता, त्यांनी त्यांच्याकडील सॅक माझ्या समोर धरुन टाक टाक टाक.. असे मला म्हणाले. त्याप्रमाणे सदरची लाच रक्कम मी त्यांचेकडील सॅकमध्ये टाकून मोजुन बघा की एकदा असे त्यांना म्हणालो असता, त्यावर डॉ. जोशी मला मोजत नसतेत... मोजत बसत असतेत आत कुठं असे म्हणून माझ्याकडन सदर लाच रक्कम स्विकारली.

पुरवणी पान नं. 01 फिर्यादी प्रकाश कैलास हांडगे यांचे फिर्यादी जबाब लगतचे असे:-

त्यावेळी मी ठरल्याप्रमाणे तोंडवर हाथ फिरवून पैसे स्विकारलेबाबतचा इशारा सापळा पथकास दिला असता, पोउपअधी. श्री. कुंभार व पथकातील स्टाफ यांनी आमच्या जवळ येवून डॉ. जोशी यांना ताब्यात घेतले, त्यावेळी पोउपअधी. श्री. कुंभार यांनी त्यांची, पंच व सापळा पथकातील अंमलदार यांचा परिचय करुन देवून, प्डॉ. जोशी यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव डॉ. श्री. माधव विष्णुपंत जोशी, वय-48 वर्षे, व्यवसाय नोकरी, जिल्हा समन्वयक, सोलापूर महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना राहणार- 103, व्दारका पॅराडाइस, मोहिते नगर, होटगी रोड, सोलापूर असे सांगितले. त्यानंतर त्यांनी स्विकारलेली लाच रक्कम पंचासमक्ष हस्तगत करुन सदर ठिकाण हे सार्वजनिक व रहदारीचे असल्याने डॉ. जोशी यांना त्यांचेकडील वर नमूद मो.सायकलसह अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, सोलापूर येथे आणून सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर पुढील सविस्तर सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे पुर्ण करण्यात आली.

तरी दि. 17/12/2024 रोजी 19.00 ते दि. 18/12/2024 रोजी 14.00 वा चे दरम्यान इतर लोकसेवक डॉ. श्री. माधव विष्णुपंत जोशी, वय-48 वर्षे, व्यवसाय नोकरी, जिल्हा समन्वयक, सोलापूर महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना यांनी सात रस्ता, शासकीय विश्रामगृह येथील सुदा इडली गृह हया हॉटेलच्या समोर सार्वजनिक रस्त्यावर आमच्या श्री. साई डायग्नोस्टिक लॅबच्या विरोधात तक्रार प्राप्त झाली असल्याचे सांगून सदर तक्रारीबाबतचा अहवाल लॅबच्या बाजूने पाठविण्यासाठी म्हणून 2,00,000/- रुपयांची मागणी करुन तसेच 02 लाख रुपये लाच न दिल्यास तक्रारीचा अहवाल लॅबचे विरोधात पाठवल्यामुळे लॅबकडून



Scanned with CamScanner

महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत केलेल्या कामाचे उर्वरीत बीले मंजूर होणार नाहीत असे भिती दाखवून माझ्याकडे स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन 2,00,000/-रू लाच मागणी करून तडजोडीअंती पहिला हप्ता म्हणून रु.1,00,000/- स्वता: स्विकारुन बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळ?वुन गुन्हे?गारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष                हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(गणेश कुंभार)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
ajit shankar lakade(I (Inspector)) / PI        **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):        **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

पोलीस निरिक्षक सदर बझार
सत्यमेव जयते
पोलीस स्टेशन सोलापूर शहर

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमलदार
सदर बझार पोलीस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ajit shankar lakade
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI



Scanned with CamScanner